साहित्य मंथन

मुस्लीम मराठी साहित्यिकापुढील समस्या

प्रा. फकरूद्दीन बेन्नूर

आम्ही फक्त साहित्यिक, कवी, गझलाकार आहोत असे म्हणणे म्हणजे, दिशाभूल आणि पलायनवाद आहे. तुमची धर्माची आणि प्रादेशिक धार्मिक अस्मिता ही तुमच्या शत्रुकरणाचा आधार आहे. पाकिस्तानमुळे आम्ही शत्रुभावी राहणार आहोत. कुराणातल्या सहिष्णुता, विवेक बुद्धीवाद, माणसाच्या बंधुत्वाच्या तत्त्वाला वहाबी, देवबंदी, तालिबानी यांच्या कर्मठ प्रचारातून बाहेर काढावे लागेल. मुळाकडे (रूट्स) जाणार म्हणजे तुमचे मराठीपण मांडणार, मुस्लीम म्हणून अस्तित्वच नसेल तर या सांस्कृतिक राजकारणाचा काय उपयोग? याचा विचार करावा लागेल. भारताचा इतिहास हा सदैव राज्यकर्ते केंद्रित राहिला आहे. त्यातही मुस्लिमांचा इतिहास हा सुलतान-केंद्रित किंवा बादशहा केंद्रित पद्धतीने लिहिला गेला आहे. त्यांच्या लढाया, सरदार, मनसबदार, दरबारी उलेमा यांच्या अतिरंजित कथा त्यांचा धार्मिक अहंकार, त्यांचा धर्मद्वेष यांनीच भरला आहे.

या घडीला मुस्लीम मराठी साहित्य परिषदेची स्थापना होऊन २८ वर्षे झालेली आहेत. या २८ वर्षांत कृष्णा–भीमेतून खूप पाणी वाहून गेले आहे. नव्वदीची परिस्थिती राहिलेली नाही. संघाच्या तथाकथित 'सांस्कृतिक राष्ट्रवादाने' विद्वेषाचे राजकारण पेरून महाराष्ट्रात आणि भारतात गोंधळ माजविला आहे. नव्वदीला ज्या काळात परिषदेची स्थापना केली, त्यावेळी मराठी साहित्य जगतात खूप काही घटना घडल्या होत्या, नवनवीन चळवळी सुरू झाल्या होत्या. मराठी साहित्यात आंबेडकरी विचारांतून प्रेरणा घेऊन लिहिते झालेल्या मागास जाती–जमातीच्या लेखकांनी व्यक्त व्हायला सुरुवात केली होती. रविकिरण मंडळ, फडके–खांडेकर–अत्रे–काणेकर यांचे युग संपले होते. एका अर्थाने, नागरी पांढरपेशा वर्गाचे लिखाण कंटाळवाणे होत चाललेले होते. मंगेश पाडगावकर, वसंत बापट यांच्या कविता वाचनाने जोर पकडला होता. माडगुळकर बंधूंच्या कथा, बनगरवाडी, चांगुणा या कथांनी मराठी साहित्यात थोडी चुळबुळ झाली होती. सत्यकथेने व दिलीप चित्रे यांनी मोठे धक्के दिले होते. पु.शि. रेग्यांच्या कादंबऱ्या, भालचंद्र नेमाडेंची 'कोसला' यांनी मराठी साहित्यात नवीन प्रेरणा निर्माण केल्या. निरनिराळे समाजघटक लिहू लागले. मागास आणि अनुसूचित जाती–जमातींच्या लेखकांचे साहित्य 'दलित साहित्य' असे म्हटले जाऊ लागले. या दलित साहित्याने मराठी ब्राह्मणी आणि मध्यमवर्गीय साहित्यात प्रचंड मोठी खळबळ माजविली. तळागाळातील जाती, उपेक्षित समाजघटक, धार्मिक–सांस्कृतिक अत्याचारांनी ग्रस्त समाजघटक यांचे जगणे, त्यांची उपेक्षा, त्यांचे दु:ख–दारिद्र्याने काळवंडलेले जीवन, त्यांचे प्रश्न दलित साहित्याने जनतेसमोर आणले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोश्यांनी त्यांना बीभत्सरसांत' घातले तरी आंबेडकरी 'हुंकार' गर्जत राहिला. ख्रिस्ती आणि वीरशैव साहित्य यांचीही दखल घेतली जाऊ लागली.

महाराष्ट्रात पंधराव्या शतकापासून ग्रामीण भागांतून मराठीतून भक्तिगीते, ओव्या आणि अभंग लिहिणारे ४९ मुस्लीम मराठी कवी होऊन गेले होते. कोकणात स्वातंत्र्यपूर्वकाळापासून कोकणी मुसलमान मराठीतून लिहीत होते. कॅप्टन फकीर महंमद जुळवे, हुसेनमियाँ माहिमकर, अबू काझी, परवेज नाईकवडे, बशीर सावकारपासून ते कवी खाबर अजीज हसन मुक्री इत्यादींचे लिखाण प्रकाशित



होते. वाचले जात होते. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र या प्रदेशातील शहरांतून मुस्लीम लेखक–कवी मराठीतून लिहित होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत शाहीर अमर शेख यांचे फड, शाहिरी काव्ये, ऐतिहासिक महत्त्वाची ठरली होती. वास्तविक रा.चिं. ढेरे यांनी 'मुस्लीम मराठी संतकवी' हे पुस्तक लिहून मुस्लीम संतांचे साहित्य प्रकाशात आणले होते. प्रा. अ.ना. देशपांडे यांनी आपल्या वाङ्मयीन इतिहासाच्या तिसऱ्या खंडातून त्यावर सविस्तर लिहिले होते. सांगलीच्या सय्यद अमीन यांनी १५/१६ कादंबऱ्या लिहिल्या होत्या. त्या गाजल्याही होत्या. सय्यद अमीन यांचे लिखाण पन्नाशीच्या आधीपासूनच सुरू झाले होते. मुस्लीम मराठी साहित्य' हा शब्दप्रयोग त्यांनीच केला होता. डॉ. यू.म.पठाण हे संत साहित्याचे अभ्यासक म्हणून सर्वपरिचित होते. हमीद दलवाईंची 'इंधन' कादंबरी कोकणातील मुस्लिमांच्या समस्यांचे आणि शिक्षित शहरी मुस्लीम तरूणाचा संघर्ष घेऊन आली होती. मराठी सारस्वतात त्यांचा नामनिर्देशही नव्हता. उलट पु.भा.भावे, माडखोलकर सारख्यांच्या लिखाणात मुस्लीमद्वेष जाणवत होता. मराठी कथा–कादंबऱ्या, नाटके यामधून मुस्लिमांचे विकृतीकरण, नकारात्मक चित्रण, यांनी भरलेले होते. ऐतिहासिक नाटके आणि कादंबऱ्या मुस्लीम द्वेष पसरविण्यात अग्रेसर होती. हा ट्रेन्ड स्वातंत्र्यपूर्वकाळापासून ब्रिटिशांविरूद्ध जागृती करण्यासाठी साधन म्हणून मान्यता पावला होता. जे काही मध्ययुगीन इतिहासात घडले, ते मध्य आशिया आणि अफगाणिस्तान भागातील आक्रमक आणि लुटारू तुर्की, मागलूक तुर्क, मंगोल यांच्यामुळे घडले होते. इराणी, बलुची, तुराणी आफाकी सरदार (बाहेरून नशीब अजमाविण्यास आलेल्या परकीय लढवय्या जमाती) कडून घडले होते. त्या घटनांना भारतातले शूद्र, मागास कष्टकरी जाती–जमातीतून मुसलमान झालेले भारतीय मुसलमान जबाबदार नव्हते. परंतु मराठी साहित्यातला विखार इतका होता की इथल्या धर्मांतरित मुसलमानांचे शत्रुकरण झाले होते. बॅ. जिना आणि मुस्लीम लीग यांच्या राजकारणामुळे झालेल्या भारताच्या फाळणीने इथल्या मुसलमानांचे अस्तित्वच शत्रुभावी करून टाकले होते.

१९८०च्या दशकापर्यंत मुस्लिमांची एक पिढी शिक्षणाकडे वळली होती. औरंगाबाद, मालेगाव, मुंबई, पुणे आदी शहरे सोडली तर बाकीच्या ठिकाणी मुसलमान मराठीतूनच शिकून लिहिते झाले होते. मराठी साहित्यात मुस्लिमांचे केवळ नकारात्मक चित्रणच नव्हते, तर महाराष्ट्रात ८/९ टक्के असलेला मुस्लीम समाज त्यांच्या खिजगणतीतच नव्हता. कोकणात तर एखादे रत्नागिरी शहर सोडल्यास मुसलमान कोकणी किंवा कोकणीमिश्रित मराठीतच बोलत होता आणि लिहीत होता. कोल्हापूरमध्ये मुसलमान मराठीतच शिकले होते. त्यांचे प्रश्न, जगणे लिहिले जातच नव्हते. १९८०नंतर दोन–तीन गोष्टी घडल्या. एक तर, प्रा.फ.म. शहाजिंदे, प्रा. जावेद पाशा, बाबा मोहम्मद अतार, प्रा. अजीज नदाफ, प्रा. बेन्नूर यांसारखे कवी–लेखक लिहू लागले होते. त्या सर्वांचे प्रतिपादन समान होते ते म्हणजे मराठी साहित्यात मुस्लिमांची कोठेच दखल घेतली जात नाही. फक्त नकारात्मक चित्रणच केले जात आहे. दुसरी गोष्ट म्हणजे मुस्लीम विरोधाने भरलेल्या वसाहतवादी इतिहासचाच पगडा आर.सी. मुजुमदार,

के.एम.मुन्शींपासून ते गो.स. सरदेसाई सारखे इतिहासकार आणि मराठी विचारवंत यांच्यावर होता. प्रभाव म्हणण्यापेक्षा ते वसाहतवादी इतिहासच आपले संशोधन म्हणून सांगत होते. तिसरी गोष्ट म्हणजे, सर्व जाती–जमातींच्या चळवळी आणि साहित्य जोमाने पुढे येत होते. सोलापूरला आम्ही या परिस्थितीवर चर्चा करीत होतो. कारण, आमचे लिखाण मोठ्या प्रमाणावर नाकारले जात होते. १९८१–८२पासून दंगलींचे राजकारण सुरू झाले होते. १९६९मध्येही दंगलींची लाट येऊन गेली होती. दंगली पेटविल्या जात होत्या. मुसलमानांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जात होते. चिथावणीखोर प्रचाराला मुसलमान बळी पडून मुसलमानांकडूनही हिंसक गोष्टी घडत होत्या. हे कुठेतरी स्पष्ट करणे आवश्यक होते. शाहबानो प्रकरणात मुस्लीम धर्मगुरूंचे वागणे–बोलणे चुकीचे होते. त्यामुळे सर्वसामान्य मुसलमान जास्त अडचणीत आला. संघपरिवाराने बाबरी मस्जिदीचे राजकारण हाती घेतले. बाबरच्या नावाने इथल्या भारतीय वंशाच्या, वंश, सांस्कृतिकदृष्ट्या भारतीय मातीचा असलेल्या मुस्लिमांचे शत्रुकरण चालू झाले होते. पर्सनल लॉ बोर्डचे सदस्य असणाऱ्या अशरफ वर्गाच्या उलेमा, आणि सय्यद शहाबुद्दीन, इमाम बुखारी, जमियत उल–उलेमा, देवबंदमधील उलेमा यांनी कर्मठ, शब्दवादी धर्माचे चष्मे लावले असल्याने संघाची ही रणनीती कळतच नव्हती. काय करावे, हा प्रश्न होता.

म्हणून आम्ही सोलापुरात मुस्लीम मराठी साहित्य परिषद स्थापन केली. १९९०ला पहिले संमेलन घेतले. प्रतिसाद अतिशय चांगला आणि प्रोत्साहनात्मक होता. आमच्या संमेलनाच्या बातम्या महाराष्ट्रभर गाजत राहिल्या. महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या ठिकाणांतील बिगरमुस्लीम विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, इतकेच नव्हे तर, राजकीय व्यक्ती यांची अभिनंदनाची पत्रे आली. आमची साहित्याची ही चळवळ, मुस्लीम प्रबोधनाच्या दृष्टीने महत्त्वाची असल्याचे बोलले गेले. अर्थात, संघविचारांच्या लोकांची कुचेष्टा करणारी 'मुस्लीम' आणि 'मराठी साहित्य' कसे होऊ शकते, मुस्लिमांना मराठी येते का, वगैरे वगैरे वर्तमानपत्रातून त्यांची मते येऊ लागली. हे त्यांचे घोर अज्ञान तरी होते किंवा मुस्लिमांचे मराठी अस्तित्वच नाकारणे होते. त्यावेळी वातावरण एवढे गढूळ झाले नव्हते. सामाजिक अभिसरण बऱ्यापैकी होते. आमच्या संमेलनाला पाठिंबा देणाऱ्या बिगरमुस्लीम श्रोते, कार्यकर्ते यांची संख्या मोठी होती. मराठीतून लिहिणाऱ्या मुस्लीम मराठी कवी–लेखक यांची संख्या १५०च्या वर गेली. ख्रिस्ती साहित्याप्रमाणे धर्मावर भर देणारे लेखन आमचे नव्हते. महाराष्ट्रातील मराठी मुस्लिमांच्या जीवन–मरणाचे प्रश्न घेऊन आमचे साहित्य पुढे आले. मुस्लीम मराठी साहित्य म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर आम्ही आमच्या पद्धतीने दिले. मराठी माणूस मुसलमान म्हणून जगत असताना त्याच्या जीवनात निर्माण होणारे ताणतणाव, ते व्यक्त करणारे साहित्य होय, म्हणजे, मराठी प्रदेशात जन्म घेतलेल्या वंश–सांस्कृतिक (एथ्नो कल्चरल) दृष्ट्या पूर्णपणे मराठी जमिनीची माती असलेल्या मराठी मुसलमानांच्या प्रश्नांचा विचार करणारे साहित्य होय. इथल्या धर्माने आणि धार्मिक संघर्षाने निर्माण केलेले प्रश्न, वसाहतवादी आणि राष्ट्रवादी (?) इतिहासाने लादलेले परकेपण जातीव्यवस्थेत विभागले गेलेल्या मराठी मुसलमानांच्या मनात आणि व्यवहारात चाललेले द्वंद्व, जमातवादी राजकारणातून घडविल्या जाणाऱ्या दंगली, त्यांचे मुस्लीम समाजावर होत असलेले परिणाम यांची चर्चा करणे, हे आमच्या साहित्य परिषदेचे उद्दिष्ट होते.

धार्मिकतेऐवजी भौतिक–सामाजिक प्रश्नांचा, धर्मनिरपेक्ष राजकारणाचा प्रभाव ऐंशी आणि नव्वदीतल्या विचारवंतांवर आणि सामाजिक कार्यकर्त्यांवर पडलेला होता. त्यामुळे आम्हाला भरपूर पाठिंबा आणि प्रोत्साहन मिळत गेले. डावे, अतिडावे, मध्यममार्गी, समाजवादी (?) स्वत:ला पुरोगामी म्हणविणारे या सर्वांचे एका प्रक्रियेकडे किंवा हिंदुत्ववाद्यांच्या समाजातील सर्व घटकांचे खोट्या इतिहासाने 'ब्रेन वॉशिंग' करण्याच्या कुटिल नीतीकडे दुर्लक्ष झाले त्याबद्दल मधून मधून लिहिले जात होते. परंतु त्याचा प्रतिवाद करणारी देशव्यापी चळवळ उभी राहिली नाही. शाहबानो आणि बाबरी मस्जिद प्रकरणाचा वापर करून दंगली घडविल्या गेल्या. संघप्रणीत हिंदुत्व फैलावत गेले जो हिंदू समाज सहिष्णु होता मध्यममार्गी होता, तो धर्मवादी होत गेला. साहजिकच इ.स. २०००पासून आमचा पाठिंबा घटत गेला. विसाव्या शतकाच्या आठव्या आणि नवव्या दशकाचा काळ जनजागरणाचे वातावरण निर्माण करणारा होता. दलितांचे, आदिवासींचे, वीरशैवांचे, जैनांचे प्रश्न हाताळले जात होते. आमच्या व्यासपीठामुळे (परिषदेमुळे) मराठी मुसलमानांचे अस्तित्व अधोरेखित झाले. ४९ मुस्लीम मराठी संतांचे मराठी साहित्य प्रकाशात आणले. कोकणी मराठी, मुस्लिमांची मराठी शाहिरी, लोकगीते, विदर्भातील अहिराणी भाषेतील कवने यांना वाचा फोडली. स्वातंत्र्य चळवळीतील सर्वसामान्य मुसलमानांचा सहभाग, १८५७मध्ये त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध दिलेला लढा, त्यांचे स्वातंत्र्य आंदोलनातले योगदान, यावर प्रकाश टाकला. साहजिकच संघपरिवारातील साहित्यिक व

प्रचारक अडचणीत आले. नाटक–कादंबऱ्यातील भडक नकारात्मक चित्रण आणि इतिहासाचे विकृतीकरण यांची चर्चा सुरू झाली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ख्रिस्ती वसाहतवादी, साम्राज्यवादी इतिहास हाच भारतातल्या इतिहासकारांचा इतिहास झाला आहे. हा मुद्दा लावून धरला. प्रत्येक संमेलनातून एक परिसंवाद इतिहासावर ठेवला गेला. ब्रिटिश आणि युरोपियनांनी मुसलमानांबद्दल संदर्भ तोडून लिहिलेल्या भडक आणि खोट्यानाट्या गोष्टी, जेम्स मिल, डाऊसन इलियट यांनी मध्ययुगीन भारताचा इतिहास हा 'हिंदू–मुसलमानांच्या धार्मिक संघर्षाचा इतिहास आहे' याचा प्रतिवाद केला. आर.सी. मुजुमदार आणि सावरकरांनी लिहिलेला इतिहास यांचे बोलाविते धनी कोण, हे स्पष्ट करीत गेलो. साहजिकच संघपरिवार आणि सावरकरी विचारांच्या प्रचारकांना धक्के बसायला लागले. सर्व इतिहासलेखन (भारतीय इतिहासकारांचे) इलियट–डाऊसन यांच्या लावालावी करणाऱ्या ग्रंथावर आधारित होते आणि आहे. २००० पासून भाजप–संघ परिवार तोच इतिहास जोराने पुढे आणत आहे. वास्तविक, जेम्स मिल, इलियट डाऊसन यांच्या इतिहासलेखनाची बदमाषी उघड करणारी अभ्यासपूर्ण पुस्तके पाश्चात्त्य अभ्यासकांनी लिहिली होती. एडवर्ड सैद यांचे जगप्रसिद्ध पुस्तक 'ओरिएंटॅलिझम' याची चौफेर चर्चा सुरू झाली होती. त्या नवीन संशोधनाकडे लक्ष न देता, मुसलमानांचे शत्रूकरण वाढविण्यासाठी हिंदुत्ववादी तोच इतिहास मांडत राहिले आहेत. प्रा. जावेद पाशा आणि स्वत: मी, हे महाराष्ट्रभर बोलत राहिलो. प्रा. जावेद पाशा यांनी मुस्लिमांच्या धर्मांतराचा इतिहास विशद करणाऱ्या पुस्तिका लिहिल्या. राष्ट्रवादाच्या सिद्धान्तनातून धार्मिक राष्ट्रवादाची कल्पना इम्पॅजिन्ड कम्युनिटी (कल्पित समाज) कशी मांडली गेली आहे हे बोलत गेलो. वास्तविक, भारत हे हिंदू धर्मियांचे राष्ट्र कधीच नव्हते. शेकडो प्रादेशिक जीवनपद्धती, पंथ, आणि उपपंथ यांचे बहुभाषिक, बहुवांशिक सिव्हीलायझेशन होते. अशोकाच्या आज्ञापत्रकाच्या इ.स. पूर्व पाचव्या शतकापासून ते अल्–बेरूनीच्या बाराव्या शतकापर्यंत हिंदू धर्माचा उल्लेख कोठेच येत नाही. ज्या विभिन्न पंथांनी भारतीय धर्म बनला होता, त्यांना त्यांच्या त्यांच्या स्वतंत्र नावाने ओळखले जाई.'' (रोमिला थापर–वाटसरू, १५ जाने २०१८)

महंमद बिन कासीम, बाबर, औरंगजेब यांचा आमच्याशी काही संबंध नाही. ते वंश–सांस्कृतिकदृष्ट्या परकीय होते. त्यांचा इतिहास हा आमचा इतिहास नाही. हा आमच्या मानगुटीवर बसविला गेलेला इतिहास आता नाकारावा लागेल. त्यांचे समर्थन बंद करावे लागेल. हे एकविसाव्या शतकातील साहित्यिक–विचारवंत यांच्यापुढील आव्हान आहे. भारतातल्या धर्मांतरित वंश–सांस्कृतिक मुसलमानांचा इतिहासच लिहिला गेलेला नाही.

आमच्या चळवळीचे कोणतेही राजकारण नव्हते. राजकारण तर ब्राह्मणी हिंदुत्ववादी करीत होते. धर्मावरून आमचे भारतातील नैसर्गिक अस्तित्वच नाकारले जात होते. तळागाळातील शूद्र, अतिशूद्र आणि कष्टकरी जाती–जमातीनेही चातुर्वर्ण्याच्या जाचापासून सुटण्यासाठी सूफी संतांच्या समतेच्या शिकवणुकीतून प्रभावित होऊन इस्लामचा स्वीकार केला होता. वास्तविक भारतीय सिव्हीलायझेशन (सभ्यता) धर्माधिष्ठित नव्हती. पंथ होते. ब्राह्मण हा ब्राह्मणी परंपरेतील प्रवाह, श्रमण हा बौद्ध व जैन परंपरेतील प्रवाह होते. (रोमिला थापर) 'श्रमण' हा शब्द बौद्ध परंपरेतून बऱ्याच ब्राह्मणेतर पंथांनी घेतला होता. वीरशैवांचा पंथ, संत बसवण्णा यांच्या प्रतिपादनांतून विकसित झालेला लिंगायत पंथ आणि आर्येतर धर्माचे पंथ यांचे मिश्रण म्हणजे हिंदुस्तान होता. 'हिंदू' हा शब्ददेखील अरबांनी इथल्या लोकांवर लादला होता. तो प्रदेशवाचक होता. त्याचा ब्राह्मणी धर्माशी काही संबंध नव्हता. उत्तरेत उलेमा आणि राज्यकर्त्यांनी धर्मांतरे घडविली होती. दक्षिणेतील ऐतिहासिक परिस्थिती भिन्न होती. दक्षिणेतील कष्टकरी जाती–जमातींनी स्वीकारलेला हा इस्लाम फक्त उपासनेपुरता होता. इतर पंथांप्रमाणेच एक पंथ एवढ्याच अर्थाने समता आणि बंधुत्व असलेला धर्म म्हणून त्यांनी स्वीकारला होता. म्हणून प्रख्यात समाजशास्त्रज्ञ शैल मायाराम यांनी या प्रक्रियेला दोन धर्मांतील संयुक्त प्रभाव (लिमिनल) असे म्हटले आहे. अशा संयुक्त प्रभाव असलेल्या तथाकथित धार्मिक समूहांत दोन्ही धर्मांतील रूढी, चालीरीती, पूजापद्धती, संतपरंपरा यांचे एकत्रीकरण झालेले असते. म्हणून हिंदू देवतांना मुस्लीम भेट देतात. हिंदू हे पीरांना मानताना दिसतात. (इम्तियाज अहमद–लिव्हड् इस्लाम इन साऊथ इंडिया– शैल मायाराम पा. १८ ते ४० योगिंदर सिकंद–पा. १६६ ते १८६ – सोशल सायन्स प्रेस–२००४) आमचे प्रतिपादन हे पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वीचे होते. त्याचे सिद्धान्तीकरण तज्ज्ञांनी आता हाती घेतले आहे. हा संयुक्त प्रवाह दाखविणारी दोन पुस्तके योगिंदर सिकंद (सेक्रेड स्पेसेस), सबा नकवी (सलोख्याचे प्रदेश) या दशकात

लिहिली गेली आहेत. हे आम्ही तुळजापूरला जाणारे मुसलमान, वारकरी पंथात असलेले मुसलमान, लिंगायत देवतांना मानणारे मुसलमान, दर्ग्यांना पूजणारे हिंदू यांची उदाहरणे देऊन सांगत होतो. धर्मांत केलेल्या जाती-जमातींनी आपल्या पूर्वीच्या महत्त्वाच्या श्रद्धा सोडलेल्या नव्हत्या. महाराष्ट्रात बाहेरून आलेल्यांची संख्या एकदम कमी होती. हा मुसलमान सर्वार्थाने 'मराठी' किंवा 'महाराष्ट्री' होता. बौद्धांची कत्तल करणारे आमच्या धर्मांतराबद्दल बोलत होते.

आमच्या साहित्य परिषदेने फक्त इस्लामवर लिहलेलं नाही, धर्मावर लिहण्याचे उदिष्ट नव्हते. तो कुराण आणि हदीसवर आदर्शावर आधारलेला आहे.

इस्लाम बुद्धिवादाची कास धरणारा होता. समता, बंधुत्व आणि सामाजिक न्याय हे इस्लामचे उद्दिष्ट होते. इस्लामचे पाशवीकरण ख्रिस्ती इतिहासकारांनी केले होते. अरबस्तानातील थोर इमाम, आणि धार्मिक पंडित यांनी इस्लामचे विपरीत अर्थ लावले होते. महंमद गझनीपासून ते औरंगजेबपर्यंतच्या कालखंडात होऊन गेलेले धार्मिक पंडित अणि उलेमा (यांतील बहुतेक परकीय प्रदेशातील) होते. अरबस्तान, इराण, तुर्कस्तान हा सर्व प्रदेश एकधर्मीय असल्याने उलेमांना किंवा उत्तर भारतात आलेल्या अरब, पठाण, तुर्कांना दुसऱ्या धर्मांची माहितीच नव्हती. ते इस्लाम सोडून बाकीच्यांना मूर्तिपूजक म्हणत होते. या सर्व इतिहासात जाण्याची त्या काळात आम्हाला गरज भासली नाही. वहाबी, उलेमा आमच्या अंगावर त्या वेळी आले नव्हते. किंबहुना आमचा उद्देश महाराष्ट्रातील मुसलमानांचे नैसर्गिक अस्तित्व, त्यांचे जगणे, त्यांच्या बोली भाषा, त्यांच्यातील जाती, त्यांचे आर्थिक, सामाजिक प्रश्न, दंगली, स्त्रियांचे प्रश्न हे मराठी सारवस्तासमोर मांडणे हे होते. महाराष्ट्रातला मराठी मुसलमान कोण आहे, काय आहे हे सांगणे आवश्यक होते. आमच्या साहित्यिकांत डॉ. यू.म. पठाण आणि डॉ. जुल्फी सोडले तर बाकीचे कवी, लेखक हे कनिष्ठ जातीयच होते. मध्यम वर्गीय प्रेरणा त्यात नव्हत्याच. इथला मराठी मुसलमान पंधराव्या शतकापासून मराठीचा वापर करीत असताना मुसलमान म्हणून उर्दू त्यांच्यावर लादली जात होती. त्यांना धार्मिक राष्ट्रवादाच्या चौकटीत अडकवले जात होते.

हिंदुत्ववाद्यापेक्षा जास्त दहशत शब्दवादी मुल्ला-मौलवींची आहे! ते नवव्या शतकाच्या पुढे यायला तयारच नाहीत. या कूट प्रश्नाला सामोरे जावे लागेल. आम्ही फक्त साहित्यिक, कवी, गझलाकार आहोत असे म्हणणे म्हणजे, दिशाभूल आणि पलायनवाद आहे. तुमची धर्माची आणि प्रादेशिक धार्मिक अस्मिता ही तुमच्या शत्रुकरणाचा आधार आहे. पाकिस्तानमुळे आम्ही शत्रूभावी राहणार आहोत. कुराणातल्या सहिष्णुता, विवेक बुद्धीवाद, माणसाच्या बंधुत्वाच्या तत्त्वाला वहाबी, देवबंदी, तालिबानी यांच्या कर्मठ प्रचारातून बाहेर काढावे लागेल.

भारतातला राष्ट्रवाद हा आयात झालेला युरोपियन विचार होता व आहे. औद्योगिक भांडवलशाहीच्या सोयीसाठी तो विकसित झाला होता. देशातील जनतेला संघटित करून त्यांना कामाला लावण्यासाठी धर्म, भाषा, संस्कृती, इतिहास यांचा आधार घेऊन मोनोलिथ समाज तयार करण्याचे त्याचे उद्दिष्ट होते. मोनोलिथ समाज म्हणजे बहुसंख्याकांच्या धर्मावर, भाषेवर आधारलेला समाज. भारतात अठरा पगड जाती-जमाती, धर्म, पंथ, होते. मागे म्हटल्याप्रमाणे 'हिंदू प्रदेशवाचक शब्दाचे रूपांतर, धर्मामध्ये करण्यात आले होते. एरिक हॉब्जबाम यांनी म्हटल्याप्रमाणे इतिहास हा राष्ट्रवादाच्या विचारसरणीची रचना करण्यासाठी तसा रचला जातो. हॉब्जबामने राष्ट्रवाद घडविण्याला इतिहासाचा रोल हा नशा निर्माण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मादक पदार्थासारखा असतो असे म्हटले आहे. म्हणून आम्ही आमच्या संमेलनातून सातत्याने इतिहासावर चर्चा घडविली. भारतात इतिहास हा धर्मनिरपेक्षतावादी आणि धार्मिक किंवा कृतक राष्ट्रवादी यांच्यातील संघर्षाचा मुद्दा बनलेला आहे. एकोणिसाव्या, विसाव्या शतकात प्रश्न वसाहतवादाविरूद्धच्या लढ्याचा होता. धर्म आणि संस्कृतीने राष्ट्र निर्माण होते का नाही, हा नव्हता. नाही तरी भारतासारख्या बहुधार्मिक, बहुसांस्कृतिक प्रदेशात युरोपियन राष्ट्रवादाची मांडणी करणे, म्हणजे बेनडिक्ट अंडरसनच्या शब्दांत कल्पित समाजाचा (इमॅजिन्ड कम्युनिटी) पुरस्कार करण्यासारखे होते. म्हणून आमचे साहित्यिक प्रादेशिक धर्मनिरपेक्ष राज्याची मांडणी करीत होते. आम्ही मराठी मुसलमानांचे भौतिक-सामाजिक प्रश्न मांडले.

आमच्या साहित्यिकांनी २०००पर्यंत असे हिंदू-मुस्लीम प्रबोधनाचे प्रश्न मांडले. महाराष्ट्रात यासंबंधी चर्चा चालू झाली. त्यामधूनच मुस्लीम ओबीसी चळवळ उभी राहिली. ती उत्तर भारतापर्यंत जाऊन तिचे पर्यवसान सच्चर समितीचा अहवाल येण्यामध्ये झाले. त्या अहवालातील प्रश्न मुस्लीम ओबीसींनीच उभे केले होते. एकविसाव्या शतकातील परिस्थिती बदललेली आहे. काँग्रेसच्या राजकारणामुळे संघपरिवाराला हिंदू जमातवाद वाढविण्याची संधी मिळाली.

बाबरी मस्जिदीपासून सुरू झालेले इथल्या सर्वसामान्य हिंदूंचे जमातवादीकरण, मुस्लीम द्वेषाचे राजकारण वापरून, इतिहासाची कृतक आणि खोटी मांडणी सातत्याने करून, वाढवित नेले. नरेंद्र मोदींना पुढे करून सत्ता मिळविली. खोटी आश्वासने देऊन लोकांत भ्रम निर्माण करणे आणि भडक भाषणे देऊन वातावरण पेटविणे, मुसलमान म्हणजे पाकिस्तानी असे समीकरण मांडून सत्ता पक्की केली. केंद्रापासून राज्यापर्यंत शासनाच्या प्रत्येक क्षेत्रांत रा.स्व. संघाची माणसे बसविली. डॉ. आंबेडकरप्रणीत लोकशाही संस्था निकालात काढल्या. न्यायालयांचेदेखील संघीकरण होत चाललेले आहे. सर्व प्रसार माध्यमे विकत तरी घेतली किंवा दहशतीखाली ठेवली. विचारवंतांचे मुडदे पाडण्यात आले. म्हणजे आर्य समाज, हिंदू महासभा, रा.स्व. संघ यांचा मुसलमानांच्या शत्रुकरणावर आधारित हिंदू राष्ट्र निर्मितीचा उद्देश पूर्ण होत आलेला आहे. मॅक्समुल्लर आणि विल्यम जोन्स यांनी आर्यश्रेष्ठत्वाचा प्रचार केला. युरोपातील उच्च वर्णीयांचे त्याच्याशी साम्य दाखविले. तेव्हापासून भारतातल्या उच्चवर्णीयांत आर्यश्रेष्ठत्व भिनून राहिले. इस्लामचे अपहरण करून त्याचे ब्राह्मणीकरण न करता आल्याने त्यांनी बौद्धांच्या बाबतीत स्वीकारलेली अपहरणाची आणि हत्याकांडाची रणनीती लागू करता आली नाही. त्यामुळे पठाणी आणि तुर्क, मंगोल राजकर्त्यांच्या चातुर्वर्ण्य मक्तेदारांच्या धुरीणत्वाची पंचाईत झाली. त्याचा राग वरिष्ठ वर्णीयांच्या मनोवृत्तीत भरून राहिला आहे. त्यांनी युरोपातून साम्राज्यवाद्यांनी आणलेला 'धर्माधिष्ठित राष्ट्र'चा विचार चाणाक्षपणे पकडला आणि इतिहासाचे रचित वापरून हिंदू धर्म आणि राष्ट्रवाद यांची सांगड घातली. बिगर हिंदू जमातींना परकीय, राष्ट्रद्रोही ठरवून टाकले. बहुसंख्य जमातीतील अभिजन वर्गाची विचारप्रणाली ही राष्ट्रवादाची विचारप्रणाली बनते. हिटलर-मुसोलिनीचे अनुकरण करून (ज्यू धर्मियाप्रमाणे) मुसलमानांचे शत्रुकरण करून बहुजन जातींना संघटित केले. इथले धर्मांतरित मुसलमान त्यांचा बळीचा बकरा झाले आहेत. हे विचार आमचे साहित्यिक विसाव्या शतकातील खुल्या वातावरणात मांडत राहिले. त्याला थोडे बहुत यशही मिळाले.

आता एकविसाव्या शतकाचे स्वरूपही बदललेले आहे. परिस्थिती स्फोटक झाली आहे. निवडणुकांच्या सत्ताकारणासाठी मुस्लिमांचे शत्रुकरण आणि पाशवीकरण करून, हिंदुत्वाचा ज्वर निर्माण करून, निवडणुका जिंकल्या जात आहेत. मुस्लीम माणसाशी बोलणेदेखील अपराध झाला आहे. अमेरिका किंवा दक्षिण आफ्रिका या देशांत कृष्णवर्णीय वंशांच्या माणसाचे अलगीकरण केले जात असे त्याला 'अपर्थिड' म्हटले जाई. तसे वागविले जाई. त्यामध्ये कृष्णवर्णीयांचे वेगळे आणि हीन अस्तित्व शिल्लक असे. हिंदुत्ववाद्यांच्या राज्यात मुस्लिमांचे नागरी अस्तित्वच नाकारले जात आहे. आमची स्थिती अपर्थिडपेक्षाही वाईट आहे. त्यांचा भारतात असण्याचाच अधिकार नाकारला जात आहे. अशा परिस्थितीत अस्मितेला काही अर्थच राहात नाही. भूमिपुत्र किंवा प्रादेशिक अस्मिता नाकारली जात आहे. अस्मिताच शत्रूभावी ठरत असेल तर अस्मितेचा हुंकार अर्थहीन आहे. या आव्हानांचा विचार मुस्लीम मराठी साहित्यिकांनी आता करणे आवश्यक आहे. जुनी समीकरणे बदलावी लागतील. प्रतिसाद कमी होत जाणारी संमेलने भरवून काही उपयोग होणार नाही.

मुसलमानांनी सांस्कृतिक राजकारण करायचे म्हणजे काय करायचे? अरबी शब्दवादी इस्लाम आणि भारतातला सूफींनी विकसित केलेला धर्माधर्मांचे संयुक्त प्रवाह असणारा इस्लाम, यापैकी एक गृहीत धरावे लागेल. मुस्लीम मराठी साहित्यिकांना बंदिस्त धर्माच्या चौकटीबाहेर येऊन जमालुद्दीन अफगाणी यांनी म्हटल्याप्रमाणे भारतातले इतर सांस्कृतिक प्रवाह आपले म्हणून स्वीकारावे लागतील. समस्या कठीण आहे परंतु या संस्कृतीच्या

धर्माचा जागर करून काय साध्य करणार आहोत? हिंदुत्ववाद्यापेक्षा जास्त दहशत शब्दवादी मुल्ला-मौलवींची आहे! ते नवव्या शतकाच्या पुढे यायला तयारच नाहीत. या कूट प्रश्नाला सामोरे जावे लागेल. आम्ही फक्त साहित्यिक, कवी, गझलाकार आहोत असे म्हणणे म्हणजे, दिशाभूल आणि पलायनवाद आहे. तुमची धर्माची आणि प्रादेशिक धार्मिक अस्मिता (आयडेंटिटी) ही तुमच्या शत्रुकरणाचा आधार आहे. पाकिस्तानमुळे आम्ही शत्रुभावी राहणार आहोत. कुराणातल्या सहिष्णुता, विवेक बुद्धीवाद, माणसाच्या (फक्त मुसलमानांच्या नव्हे) बंधुत्वाच्या तत्त्वाला वहाबी, देवबंदी, तालिबानी यांच्या कर्मठ प्रचारातून बाहेर काढावे लागेल. मुळाकडे (रूट्स) जाणार म्हणजे तुमचे मराठीपण मांडणार, मुस्लीम म्हणून अस्तित्वच नसेल तर या सांस्कृतिक राजकारणाचा काय उपयोग? याचा विचार करावा लागेल. भारताचा इतिहास हा सदैव राज्यकर्ते केंद्रित राहिला आहे. त्यातही मुस्लिमांचा इतिहास हा सुलतान-केंद्रित किंवा बादशहा केंद्रित पद्धतीने लिहिला गेला आहे. त्यांच्या लढाया, सरदार, मनसबदार, दरबारी उलेमा यांच्या

अतिरंजित कथा त्यांचा धार्मिक अहंकार, त्यांचा धर्मद्वेष यांनीच भरला आहे. दरबारी भाट असलेल्या तवारिखकारांनी बादशहाला खूष करण्यासाठी भडक आणि पुरावाहीन गोष्टी घुसडल्या आहेत. (हरबन्स मुखिया-परस्पेक्टिव्ह ऑन मेडिव्हल हिस्टरी -१९९३) एकतर महमद बिन कासीमपासून ते औरंगजेबपर्यंतचे राज्यकर्ते अरबी, तुर्क-मंगोल, पठाण, मोघल असे परकीय होते. त्यांचे धर्ममार्तंडही अभारतीयच होते.

भारतात निरनिराळ्या काळी धर्मांतरित झालेल्या भारतातल्या जाती-जमातींतून उदयाला आलेले ते राज्यकर्ते नव्हते. परकीय सत्ताधाऱ्यांचा इतिहास हा इथल्या वंश-सांस्कृतिकदृष्ट्या भारतीय असलेल्या मुसलमानांचा इतिहास कसा होऊ शकतो? तो इतिहास ब्रिटिश ख्रिस्ती साम्राज्यवादी इतिहासकारांनी आम्हाला चिटकविला आहे. महंमद बिन कासीम, बाबर, औरंगजेब यांचा आमच्याशी काही संबंध नाही. ते वंश-सांस्कृतिकदृष्ट्या परकीय होते. त्यांचा इतिहास हा आमचा इतिहास नाही. हा आमच्या मानगुटीवर बसविला गेलेला इतिहास आता नाकारावा लागेल. त्यांचे समर्थन बंद करावे लागेल. हे एकविसाव्या शतकातील साहित्यिक-विचारवंत यांच्यापुढील आव्हान आहे. भारतातल्या धर्मांतरित वंश-सांस्कृतिक मुसलमानांचा इतिहासच लिहिला गेलेला नाही. तसा प्रयत्न प्रा. जावेद पाशा, प्रा. शहाजिंदे, प्रा. बेन्नूर यांनी केला आहे. यामध्ये आणखी एक प्रश्न आहे. महंमद बिन कासीमपासून ते औरंगजेबापर्यंतचा इतिहास अनेक खोट्या गोष्टींनी भरला आहे. तीही वस्तुस्थिती स्पष्ट करावी लागेल. तरच तुम्हाला तथाकथित मुळाकडे जाता येईल.

तर मुळाचा विचार कसा करणार? मुळाकडे जाणे हे एका प्रकारे पुनरुज्जीवनवादाकडे जाणे असते. शैल मायाराम आणि योगेंद्र सिकंद यांच्या मते भारताची जीवनपद्धती संमिश्र नसून विविध धर्मातील संयुक्त प्रवाहांनी बनलेली आहे. महाराष्ट्राचे संत बाबा शेख महंमद वारकरी संप्रदायाचे भक्त होते. शाह मुंतोजी ब्राह्मणी एकाच वेळी मुसलमान, आणि स्वामी सहजानंदांचे शिष्यत्व पत्करणारे आनंद संप्रदायी होते. वीरशैवी धर्माचे अभ्यासक होते. या सर्व संप्रदायात वावरून ज्ञान आत्मसात करून घेऊन ते मुसलमानच राहिले. त्यांच्या लिखाणावर इस्लाम आणि महाराष्ट्रातील हिंदू म्हणविणाऱ्या सर्व संप्रदायांचा प्रभाव आहेत. शहागडचे शहामुनींचे वैशिष्ट्य म्हणजे जसे आलमखान हे नागेश पंथीय झाले होते. तसे शहामुनी हे महानुभावी झाले होते. हा डॉ. इम्तियाज अहमद यांच्या शब्दात जगण्यातला इस्लाम होता. या संयुक्त प्रवाहात कोणत्या मुळाचा शोध घेणार? ब्रिटिश वसाहतवादाने इथल्या संयुक्त प्रवाही संस्कृती नष्ट करून भारतातल्या 'इंडिजिनस' संस्कृती कनिष्ठ ठरविल्या आणि ब्राह्मणी विचारांचे मानक भारतीय संस्कृती म्हणून विकसित करायला मदत केली. (के.एन.पष्णीकर,) ॲन अजेंडा फॉर कल्चरल ॲक्शन, पा.३६) हाच मुद्दा पकडून ब्राह्मणी अभिजनांनी वेदांवर आधारित ब्राह्मणी संस्कृतीची पायाभरणी केली. ऑक्सफर्ड डिक्शनरी ऑफ सोशॉलॉजीप्रमाणे संस्कृती हा शब्दप्रयोग कलेच्या योगदानासंबंधी केला जातो. जर्मन अभ्यासकांनी संस्कृती (कल्चर) आणि सभ्यता (सिव्हिलायसेशन) यांत फरक मानला आहे. (पा. १३२-१३३) धर्माची व्याख्या पवित्राच्या कल्पनेवर आधारित श्रद्धा, प्रतीके, कर्मकांडे अशी केली आहे. सांस्कृतिक राष्ट्रवादांत विशिष्ट धर्माधिष्ठित संस्कृती ही आधारभूत मानली जाते. तेव्हा सांस्कृतिक राजकारण आर्य समाजापासूनच्या सर्व हिंदुत्ववाद्यांनी चालविले आहे. संयुक्त जीवनपद्धतीचे (लिमिनल) घटक असणाऱ्या वंश. सांस्कृतिक मुसलमानांना तशा प्रकारचे सांस्कृतिक राजकारण करता येणार नाही. मुसलमानांनी सांस्कृतिक राजकारण करायचे म्हणजे काय करायचे? अरबी शब्दवादी इस्लाम आणि भारतातला सूफींनी विकसित केलेला धर्माधर्मांचे संयुक्त प्रवाह असणारा इस्लाम, यापैकी एक गृहीत धरावे लागेल. मुस्लीम मराठी साहित्यिकांना बंदिस्त धर्माच्या चौकटीबाहेर येऊन जमालुद्दीन अफगाणी यांनी म्हटल्याप्रमाणे भारतातले इतर सांस्कृतिक प्रवाह आपले म्हणून स्वीकारावे लागतील. समस्या कठीण आहे परंतु या संस्कृतीच्या तिढ्याला हात घालावा लागेल. त्यासाठी भावनिक लेखनाच्या बाहेर यावे लागेल. सध्या मुस्लिमांच्या अनुययाच्या प्रचाराचा जो प्रकल्प राबविला जात आहे, कथा, कादंबऱ्या, कविता, गझला यामधून त्याचा समाचार घ्यावा लागेल. मुख्य प्रवाही साहित्य संमेलनाचे अनुकरण काही उपयोगाचे नाही. तू मोठा की मी मोठा? तू आधी का मी आधी? हा प्रकार बालिश आहे. इतिहास आपल्या गतीने चालला आहे. तो नोंद घेतच असतो. मुसलमानांचे एकविसाव्या शतकातील असे समस्याप्रधान प्रश्न घेऊन उतरणे हाच पर्याय आहे.

प्रा. फकरूद्दीन बेन्नूर
१०५, यश व्हिदम, पारगे नगर, वेलकम हॉल जवळ,
डीएसके अपार्टमेंट समोर, कोंढवा (खु) पुणे-४८
मो.९८२२८०७५०६